जनसंपर्क कक्ष
04 JUN 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे खेलो इंडिया स्पर्धेत यश

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी दुसऱ्या खेलो इंडिया स्पर्धेत बजावलेली कामगिरी उत्साहवर्धक असून पुढील काळात स्पर्धागणिक त्यांची कामगिरी उंचावत राहावी, अशा अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. व्दितीय राष्ट्रीय खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेत विविध क्रीडाप्रकारांत पदक प्राप्त क्रीडापटूंचा गौरव समारंभ बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या सभागृहात झाला. यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी त्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्याची बाब विद्यापीठाकडे सोपवावी. संपूर्ण लक्ष खेळ व गुणवत्ता सुधारण्यावर केंद्रित करावे. दुसऱ्या खेलो इंडिया स्पर्धेमध्ये विविध क्रीडाप्रकारांत शिवाजी विद्यापीठाच्या ८६ क्रीडापटूंनी सहभाग घेतला. त्यामध्ये ८ सुवर्ण, ७ रौप्य व ७ कांस्य अशी २२ पदके प्राप्त केली. पदकप्राप्त क्रीडापटूंना कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. क्रीडा अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.



स्पर्धेतील पदकविजेत्यांची नावे (कंसात अनुक्रमे क्रीडाप्रकार व पदक)

वैयक्तिक क्रीडाप्रकार : तेजस जोंधळे (वेटलिफ्टिंग, सुवर्ण), साक्षी रानमळे (वेटलिफ्टिंग, सुवर्ण), सरिता सावंत (वेटलिफ्टिंग, रौप्य), प्रतीक्षा साठे (वेटलिफ्टिंग, कांस्य), ऋतुजा खाडे (स्विमिंग, तीन सुवर्ण (५० मी. फ्रीस्टाईल, १०० मी. फ्रीस्टाईल व ५० मी. बटरफ्लाय)), गौरव चव्हाण (स्विमिंग, कांस्य), धनंजय जाधव (तलवारबाजी, कांस्य), ऋषीकेश पाटील (फ्रीस्टाईल कुस्ती, कांस्य), नंदिनी साळोखे (फ्रीस्टाईल कुस्ती, कांस्य), रोहन कांबळे (ॲथलेटिक्स (४० मी अडथळे), सुवर्ण), विकास खोडके (ॲथलेटिक्स (११० मी. अडथळे), सुवर्ण), सिद्धांत पुजारी (ॲथलेटिक्स (३००० मी. स्टेपल्स चेस), कांस्य), स्नेहा जाधव (ॲथलेटिक्स (हातोडाफेक), कांस्य), ज्ञानेश्वरी (नेमबाजी, कांस्य). सांघिक: योगा (पुरूष): मनन कासलीवाल, अभिजीत सावंत, अनिकेत म्हेत्रे, ऋषीराज माने, घननीळ लोंढे व ओंकारदाभोळे (सर्वांना रौप्य).

04 JUN 2022
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# कुलसचिव पदासाठी आज मुलाखती; 'परीक्षा नियंत्रक'च्या मुलाखती पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एरव्ही विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी धावाधाव करणारे स्वतःच परीक्षा देत असल्याचे चित्र शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात होते. निमित्त होते, परीक्षा नियंत्रक पदासाठीच्या मुलाखतीचे.

यात माजी परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांच्यासह दत्तात्रय नवले, हेमंत उमप, राजेंद्र पाटील, सूर्यकांत अंधारे, चंद्रकांत जाधव, मलिक रोकडे, मधुकर



भानारकर, सुजाता आडमुठे, भारत पाटील, शंकर खाडे, नितीन झावरे, श्यामल महाडीक, प्रशांत अनुभुले, सुहास पाटील, विलास नांदवडेकर, प्रकाश पाटील, अजितसिंह जाधव, बाजीराव पाटील यांनी मुलाखतीं दिल्या.

### कुलसचिवपदाच्या मुलाखतीस पात्र उमेदवार

कुलसचिवपदासाठी मुलाखत देण्यासाठी पात्र, अपात्रतेचा वाद मिटल्यानंतर अखेर आज, शनिवारी २१ जणांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले आहे. त्यात हेमंत जाधव, मोहन आबदार, राजकुमार पल्हाडे, जयदीप बागी, धनंजय ठोंबरे, नितीन झावरे, सुजाता आडमुठे, भारत पाटील, विनायक वडगावकर, प्रभाकर रामटेके, विलास शिंदे, प्रताप हलकर्णीकर, प्रकाश पाटील, मधुकर भानारकर, धर्मेश पराते, रवींद्र मुळे, अजितसिंह जाधव, सुरेश शिरबहादुरकर, लालासाहेब जाधव, विजय खोत, बाजीराव पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे यांचा समावेश आहे. १७ जूनपर्यंत या मुलाखतींची प्रक्रिया सुरू राहणार आहे.

पुढारी

# कुलसचिव पदासाठी आज मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव पदासाठी शनिवार (दि.४ जून) रोजी मुलाखती घेण्यात येणार आहेत.



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठाकडून कुलसचिव पदासाठी अर्ज प्रक्रिया राबविण्यात आली. यातून प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र उमदेवारांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. यात २१ जण पात्र तर ३० जणांना अपात्र ठरवले गेले. यासंदर्भात काही उमेदवारांनी राज्यपाल, कुलगुरूंकडे तक्रारी अर्ज दाखल करून लक्ष घालण्याची मागणी केली. यातील सहा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले आहे. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांमध्ये हेमंत जाधव, मोहन अबदार, राजकुमार पल्हाडे, जयदीप बागी, धनंजय ठोंबरे, नितीन जवारे, सुजाता आडमुठे, भारत पाटील, विनायक वडगावकर, प्रभाकर रामटेके, विलास शिंदे, प्रताप हलकर्णीकर, प्रकाश पाटील, मुरलीधर भानरकर, धर्मेश प्रतापे, रवींद्र मुळे, अजितसिंह जाधव, सुरेश शिरबहादूरकर, लालासाहेब जाधव, विजय खोत, बाजीराव पाटील यांचा समावेश आहे.

पुढारी

# परीक्षा मूल्यमापन मंडळ संचालकपदासाठी १३ उमदेवारांच्या मुलाखती पूर्ण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक पदासाठी शुक्रवारी मुलाखती पार पडल्या. पात्र १३ उमेदवारांच्या मुलाखती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी घेतल्या.

विद्यापीठाच्या वतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक पदासाठी अर्ज छाननी करून १९ पात्र, तर २२ जण अपात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. अर्ज प्रक्रियेबाबत काही उमेदवारांनी तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर कुलगुरूंनी संबंधितांचे म्हणणे ऐकून त्यांना मुलाखतीस हजर राहण्याचे निर्देश दिले. त्यानुसार ३ जून रोजी १३ जणांच्या मुलाखती झाल्या. यात माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, दत्तात्रय नवले, मलिक रोकडे, सुजाता आडमुठे, अजितसिंह जाधव, प्रकाश पाटील यांचा समावेश आहे. येत्या काही दिवसांत विद्यापीठास नवे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक मिळणार आहेत.

पुण्यनगरी

# परीक्षा मंडळ संचालक : १३ जणांच्या मुलाखती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदासाठीच्या मुलाखती पार पडल्या. छाननीनंतर १९ जण पात्र ठरले होते. त्यापैकी १३ उमेदवार मुलाखतीला सामोरे गेले.

शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालकपद रिक्त होते. या पदासाठी अर्ज मागवण्यात आले होते. पात्र उमेदवारांच्या मुलाखती शुक्रवारी झाल्या. यामध्ये विलास नांदवडेकर, दत्ता नवले, प्रकाश पाटील, सुजाता आडमुठे, मलिक रोकडे आदींचा समावेश आहे. कुलगुरू शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या मुलाखती घेतल्या. या समितीमध्ये व्यवस्थापन मंडळाचे २ सदस्य, २ विषयतज्ज्ञ आणि २ मागसवर्गीय प्रतिनिधी यांच्यासमोर या मुलाखती झाल्या.

जनसंपर्क कक्ष
04 JUN 2022 सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मूल्यमापन मंडळासाठी १३ जणांच्या मुलाखती

**कोल्हापूर, ता. ३ :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ पदासाठी १९ पैकी १३ जणांच्या आज मुलाखती झाल्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, उच्च शिक्षण विभागाचे संचालक व मागासवर्गीय प्रतिनिधी यांच्यासमोर मुलाखत प्रक्रिया झाली.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाला पूर्णवेळ संचालकांची नियुक्ती व्हावी, अशी मागणी होती. महेश काकडे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर गजानन पळसे यांच्याकडे प्रभारी संचालक पदाची जबाबदारी होती. या पदासाठी अर्ज छाननी प्रक्रियेत १९ अर्ज पात्र ठरले होते. त्यांच्या मुलाखती आज दिवसभरात झाल्या. डॉ. विलास नांदवडेकर, दत्ता नवले, प्रकाश पाटील, सुजाता आडमुठे, मलिक रोकडे यांनी मुलाखती दिल्याचे सूत्रांनी सांगितले.



उर्वरितांची नावे समजू शकली नाहीत. कुलसचिव पदासाठी डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा अर्ज असल्याने ते मुलाखत प्रक्रियेपासून दूर राहिले. त्यांनी काही दिवसांपूर्वी कुलगुरू यांच्याकडे तसा अर्ज केला होता.

तरुण भारत

# आज कुलसचिवपदासाठी विद्यापीठात मुलाखती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा मुल्यमापन मंडळाच्या संचालकपदासाठी शुक्रवारी पात्र ठरलेल्या २० उमेदवारांची मुलाखती कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखालील ७ सदस्यीय समितीने घेतल्या. दरम्यान, विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी शनिवारी, ४ रोजी पात्र उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत. कुलसचिव पदासाठी २३ इच्छूकांनी अर्ज केले आहेत. त्यांच्या मुलाखतीसाठी ८ सदस्यांची समिती गठीत केली आहे.

तरुण भारत

# इंटेरिअर डिझाईनसाठी डेक्कनमध्ये प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** इंटेरिअर डिझाईन क्षेत्राचे परिपूर्ण व्यावसायिक ज्ञान देणाऱ्या कोल्हापुरातील डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजीमध्ये विविध प्रकारचे व्यावसायिक कोर्स उपलब्ध आहेत. संस्थेत इंटेरिअर डिझाईनची शिवाजी विद्यापीठ मान्यता पदवी व महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळ मान्यताप्राप्त डिप्लोमा अभ्यासक्रम असून मोजक्याच जागा शिल्लक आहेत. या कोर्ससोबत संस्थेत राज्य व्यावसायिक शिक्षण मंडळ यांचा रोजगार कौशल्य आधारित अभ्यासक्रम बिल्डिंग साईट सुपरवायझर हा एक वर्षाचा व प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग मान्यताप्राप्त इंटेरिअर स्केप गार्डन डिझाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टी आदी कोर्सेस संस्थेमध्ये सुरू आहेत.

पदवी, पदविका व सर्टिफिकेट कोर्सच्या माध्यमातून कमी कालावधीत विद्यार्थी हे कोर्स पूर्ण केल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरु करू शकतो व इंटेरिअर डिझाईन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करू शकतो. तरी अधिक माहितीसाठी डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, तिसरा मजला, कॉसमॉस कॉम्प्लेक्स, न्यू शाहुपुरी, स्टेशन रोड, कोल्हापूर. संपर्क क्र: ०२३१- २६६६८१४, २६६७८१४ येथे संपर्क साधावा.